# 'काठ': मानवीय मनाची अबोधावस्था

**मार्गदर्शिका :**
**डॉ. मनीषा एस. नेसरकर**
मराठी विभाग प्रमुख
राणी चन्नम्मा विश्वविद्यालय, बेळगाव

**संशोधिका विद्यार्थी :**
**शिल्पा रवींद्र ठाकूर**
राणी चन्नम्मा विश्वविद्यालय, बेळगाव.

---

मनुष्य जेव्हा आपल्या इच्छा, कामवासना, अनेक आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी हतबल होतो, तेव्हा त्याला जो त्रास होतो, त्याला तो आपल्या आतल्या आत गाडून टाकण्याचा प्रयत्न करीत असतो. जेव्हा तो या गोष्टी दाबून टाकण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो त्याच वेळी त्याला अनेक भावनांचा सामना करावा लागतो. त्याला अनेक गोष्टींविषयी घृणा, तिरस्कार, भीती, संकोच निर्माण होतो. कधी कधी स्वतः विषयीही तिरस्कार, घृणा यांचा जन्म होतो. बाह्य परिस्थितीला तोंड देताना किंवा ती सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना अनेक मानसिक गुंतागुंती निर्माण होतात.

डॉक्टर सिग्मंड फ्राईड यांच्या अनुसार मनाचे तीन स्तर मानले जातात. चेतना, अवचेतना आणि अर्धचेतना या तीन अवस्थांमधून मानवीय मन कार्य करीत असते. मानवीय मनामध्ये एखाद्या गोष्टीबाबत इच्छा निर्माण होते. कधी या इच्छावर नियंत्रण ठेवले जाते, तर कधी इच्छांची पूर्तता होते. इच्छांची किंवा भावनांची निर्मिती बाह्य स्तरावरून होत असते तर त्यावर नियंत्रण किंवा त्यांची पूर्तता ही अंतरीक स्तरावर घडून येत असते. म्हणजेच मानवाचे भौतिक मन आणि नैतिक मन यामध्ये सतत संघर्ष चालू असतो. जेव्हा हा संघर्ष चेतना स्तरावर घडत असतो तेव्हा तो अधिक दुःखदायक नसतो. जितका तो अचेतन म्हणजेच अबोधावस्थामध्ये असतो. जेव्हा मनुष्य आपल्या इच्छा,

भावना, कठोरता पूर्वक कोणत्याही कारणास्तव दमन करू लागतो तेव्हा मात्र भौतिक मन आणि नैतिक मनामध्ये संघर्ष घडू लागतो आणि यांचा परिणाम मनोरोगाकडे झुकू लागतो. मानवीय मनामध्ये संघर्ष चालू होतो आणि तो अनेक रोगांची शिकार बनू लागतो. आत्मघातकी, विनाशी अशा विचारांना तो शरण जातो.

डॉ.एस.एल. भैरप्पा यांची 'काठ' ही उमा कुलकर्णी यांनी 2003 मध्ये अनुवादित केलेली कादंबरी एका स्त्रीमनाचा किंबहुना एका मानवीय अबोध मनाचा वेध घेताना दिसते. 'एका सुविद्य, संपन्न आणि सुस्वरूप स्त्रीच्या स्वभावाचे आणि परिस्थितीच्या मानसिक दडपणामुळे आत्महत्येसाठी प्रवृत्त होणाऱ्या तिच्या अंतर्मनाचे चित्रण ही कादंबरी करते.'

अमृता ही कादंबरीची नायिका. बुद्धीची चमक दाखवणारी डॉक्टरेट ने सन्मानित, कॉलेजमधील प्राध्यापिका, सुस्वरूप आणि विवाहितही, शिवाय विजय आणि विकास अशा दोन मुलांची आई. पण स्वतःच्या नवऱ्यापासून दूरावल्यामुळे ती मुलांना घेऊन स्वतंत्रपणे राहते.बाह्य वर्तनावरून सुस्वरूपी,सुविध्य, सहनशील आणि समर्थ वाटणारी, पण तीव्र संवेदनशील आणि शीघ्रकोपी असणारी अमृता, सोमशेखर या विधुर पुरुषाच्या प्रेमबंधनात अडकली जाते. त्याच्यावर उत्कट प्रेम करू लागते. आपल्या पती विषयीच्या असणाऱ्या अपेक्षा आणि भावनांना ती सोमशेखर च्या रूपात पाहते.पण त्याचवेळी ती बाह्य परिस्थितीला शरण जाते आणि मग मानवीय मनाच्या संघर्षाची सुरुवात होते. आपण योग्य आहोत की अयोग्य हेच तीला समजेनासे होते. सोमशेखर जेव्हा तिला लग्नाविषयी विचारतो तेव्हा गळ्यातील मंगळसूत्र धरून ती म्हणते " मी पवित्र राहिले नाही वेगळ्या पुरुषाशी संबंध ठेवून मी पतित झाले आहे याच पावित्र्य मी नष्ट केलं, तुम्ही माझ्याशी लग्न करणार?" (2). तिचे हे वागणे अनेक वेळा वाचकांनाही संभ्रम निर्माण करते. पण मनोविश्लेषणात्मक अभ्यास केला असता यांची उत्तरे मिळतात. आपणच आपले पावित्र्य नष्ट केले आहे आपण व्यभिचारी आहोत या नैराश्य भावनेने ती घेरली जाते.

स्वतः अनैतिकपणाने वागून पण समाजापुढे अगदी पवित्र असल्याचे ढोंग करून काकू जयलक्ष्मी या तिच्या वडिलांना आपल्या जाळ्यात ओढतात. सर्व इस्टेट आपल्या

हातांमधून जाऊ नये हा काकूंचा उद्देश असतो आणि यासाठी त्यानंतर त्या अमृताचाही बळी घेतात. तिच्या नकळत इस्टेटीचा फायदा घेतात. शिवाय कोणत्याही गोष्टीने अमृताशी साजेशा नसणाऱ्या रंगनाथ या आपल्या भावाशी तिचे लग्न लावून तर देतातच वर फसवून मातृत्वही लादतात.

या साऱ्यांची जाणीव झाल्यानंतर आपण फसवले गेलो आहोत पण आता यामधून बाहेरही पडता येणे अशक्य आहे या नैराश्याने अमृता घेरली जाते. आपण एकटे पडलो आहोत ही भावना तिला आत्महत्या करण्याच्या विचारापर्यंत घेऊन जाते. पराकोटीचा संताप, आनंद, तिरस्कार अशा अनेक भावना तिच्या वर्तनामध्ये दिसून येतात. अनेक वेळा शून्यभावाने ती घेरली जाते. तिच्या या वर्तनामागे तिची मानसिकता कारणीभूत ठरते. मानसशास्त्राचा आधार घेऊन, अतिशय सुंदर रीतीने लेखकांनी ही भावनिक गुंतागुंत वर्तनामधून प्रकट केली आहे. मानसशास्त्रीय विश्लेषणा द्वारे याचे योग्य विश्लेषण होऊ शकते.

अथांग उत्कट प्रेमाबरोबरच तीव्र क्रौर्य आणि शून्यभाव हा अमृताच्या स्वभावाचा भाग बनतो. भर रात्रीच्या वेळी एकटेच सुनसान टेकडीवर जाणे, वेगात गाडी चालवणे, रिव्हाल्वरला कुरवाळणे, कोणतेही कारण नसताना अनेक वेळा अपशब्दांनी सोमेश्वरला अपमानित करणे, वाईट शब्दांनी घायाळ करणे, खरकट्या हाताने, चपलेने मारणे, त्याच्या डोक्यावर दहीभात, सार ओतणे असा आक्रस्ताळेपणा करताना ती आढळते. पण या भावनामधून बाहेर पडल्यानंतर ती त्याची अगदी गयावया करून माफीही मागते. शिवाय आपण असे आहोत तेव्हा आपणाला त्याने समजून घ्यावे आणि तोच आपणाला समजून घेतो अशी अपेक्षाही करते. सरळमार्गी सोमशेखरवर त्याच्या पूर्वजीवनाबद्दल संशयही घेते आणि त्याच्यावर उत्कट प्रेमही करते. सोमशेखरचे प्रेम आपल्या हातून निसटू नये म्हणून ती स्वतःची तुलना पुराणातील हिडींबेशी करते. "हिडींबा भिमाला असाच त्रास देत असेल बघ! भीम झाला म्हणून काय झालं? तिच्या अघोरी प्रेमाला घाबरून एका वर्षातच गेला तो पळून! पण तरीही तो तिला आयुष्यात कधीही विसरला नसेल. त्या प्रेमाची खोली

सर्वसामान्य शांत स्वभावाच्या स्त्रीच्या प्रेमामध्ये आढळणार नाही." (3) स्वतःला हिडिंबा समजण्या मधूनही तिची सोमशेखर विषयाची एकनिष्ठा प्रकट होते. त्यांच्या संबंधांमधून रुजणाऱ्या गर्भा विषयी उत्कट प्रेमाने भारली जाते. हे आपणास हवे आहे अशी भावना व्यक्त करते. तिच्या पोटात वाढणाऱ्या भ्रूणाविषयी ती प्रेम तादात्म्याने वागते. पराकोटीचे क्रौर्य आणि उत्कट प्रेम या भावनामध्ये ती गुरफटते. भानावर आल्यानंतर आपणाला सहन करणाऱ्या सोमशेखरवर आणखी प्रेम करु लागते. "मी चांगल्या मूडमध्ये असेल तर तो मनापासून साथ देतो मी त्याच्यावर दोषारोप करत राहिले तर तो ते सगळं हलाहल पचविणाऱ्या शंकराच्या गंभीरतेनं सहन करतो"(4). असा विचार करते. पण फारच कमी वेळ ती या विचारात रमते. "जेवण झाल्यावर मी लोचटासारखी त्याच्या फोनची वाट बघत बसते. कितीतरी रात्री शून्यभावनेन घेरून हातात रिव्हाल्वर घेऊन बसते. टेकडीवर जाण्यासाठी गाडीच्या चाव्या घेउन उभी राहते, पण त्यावेळी मनात येतं, फोन आला आणि मी नसले तर? आणि त्यानंतर मी फोनची वाट बघत राहते. माझ्या मरणाच्या स्वातंत्र्यावर यान फोनन बंधन घातलं आहे."(5). कधी सोमशेखरला नाटकीय प्रेम करणारा म्हणते तर कधी त्याला स्वतःच सर्वस्व मानते. आक्रस्ताळेपणाने भर रात्री आत्महत्येसाठी टेकडीवर जाते पण त्या निर्जन रात्री घरी झोपलेल्या मुलांना अचानक जाग आली आणि आपण घरी नसू तर काय होईल या भयाने थरकापते. यानंतर रात्री-अपरात्री घराबाहेर पडायचे नाही हा निर्धारही करते. आत्महत्येचा विचार सोडून भरधाव वेगाने घरी येते. कोणतीही चाहूल मुलांना न लागू देता घरामध्ये प्रवेश करते.

तीव्र बुद्धिमान, चाणाक्ष असणारी अमृता, काकू जयलक्ष्मी, आपला नवरा रंगनाथ, भाऊ कृष्णराव, किट्टना या साऱ्यांच्या स्वभावाला पूर्णतया ओळखते. योग्य तो व्यवहारी निर्णय घेऊन त्यांना व्यवस्थित हाताळते. पण स्वतःचे व्यक्तिगत आयुष्याचे भाव विश्व् सांभाळताना मात्र कोलमडते. कधी पराकोटीची क्रूर तर कधी सहनशील, कधी उत्कट प्रेम करणारी तर कधी धारदार शस्त्रा सारखे शब्द वापरून प्रियकरावरही दोषारोप करणारी, कधी स्वतःला पवित्र माननारी, तर कधी स्वतःला व्यभिचारी समजणारी अनेक वेळा

आत्महत्येसाठी पाऊल उचलणारी पण असे कोणते आकर्षण आहे जे आपणास मरू देत नाही म्हणून अंतर्मुख होऊन मनाचा कोपरा न् कोपरा शोधणारी अशी अमृता ही नायिका लेखक आपल्या निवेदनातून साकार करतात. अमृताचे हे वर्तन समजून घेण्यासाठी मानसशास्त्राच्या आधारा बरोबरच मनोविकार शास्त्राचा ही आधार घ्यावा लागतो. एका स्त्रीच्या भावनिक मनोविश्वाचे सुंदर दर्शन घडविण्यात ही कादंबरी यशस्वी ठरली आहे असे म्हणावयास हरकत नाही. आत्महत्येच्या सीमेवर पोहोचलेली नायिका अमृता मृत्यूच्या काठावरून पुन्हा पुन्हा माघारी येते, तेव्हा कादंबरीचे 'काठ' हे शीर्षक अधिक समर्पक वाटते.

**संदर्भ ग्रंथ** :

1) डॉ. भैरप्पा एस.एल., 'काठ' अनुवाद डॉ.कुलकर्णी उमा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. तृतीय आवृत्ती एप्रिल 2016

2) तत्रैव पृ. 272

3) तत्रैव पृ. 203

4) तत्रैव पृ. 226

5) तत्रैव पृ. 226

6) पाटील विश्वास, मानसोपचार पद्धतीचे आद्य प्रणेते सिग्मंड फ्राईड, मनोरमा प्रकाशन, मुंबई.